सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३३४ | गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १,५८,५००
२२ सोने ९१.६०% : ₹ १,४७,५००
१८ सोने ७५.००% : ₹ १,२०,५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,४६०/-
भाव प्रती १० ग्राम





# विनापरवाना सौंदर्य प्रसाधनांची विक्री

## अन्न व औषध प्रशासन विभागाची अमळनेर, जळगावात कारवाई

### पडताळणी करूनच सौंदर्यप्रसाधने खरेदी करण्याचे आवाहन



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासन कार्यालयाच्या पथकाने जिल्ह्यातील काही तालुक्यांतून विनापरवाना उत्पादित सौंदर्यप्रसाधनांची विक्री होत असल्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे अमळनेर व जळगाव शहरात धडक कारवाई केली. जिल्ह्याचे सहायक आयुक्त(औषधे) डॉ. प्र. भा. अस्वार व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

प्राप्त माहितीनुसार दि. रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी अमळनेर येथील श्रीमती प्रियदर्शनी रजाळे यांच्या रवींद्रनगरातील तसेच सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी जळगावमधील श्रीमती राशीताई तळरेजा यांच्या महाबळ परिसरातील ठिकाणी पंचासमक्ष तपासणी व चौकशी करण्यात आली. दोन्ही विक्रेत्यांकडून अनुक्रमे रुपये ७२ हजार ३९२ आणि ३३ हजार ९३३ रुपये किमतीच्या सौंदर्यप्रसाधनांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यावेळी विविध प्रकारचे लेबल व बिना लेबलचे क्रीम, पावडर, जेल फॉर्ममधील उत्पादने तसेच प्रिंटेड लेबल्स, रिकाम्या बरण्या, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आदी उत्पादनांकरिता लागणारे साहित्य कोणत्याही प्रकारचा वैध उत्पादन परवाना नसताना बेकायदेशीररीत्या साठवून ठेवल्याचे आढळून आले. तसेच लेबलवर सौंदर्य प्रसाधनांची साठवणूक करून त्यांची गुणवत्ता तपासणी न करता विक्री केली जात असल्याचेही निदर्शनास आले.

जप्त केलेल्या मालामध्ये विविध क्रीम, पावडर स्वरूपातील अनेक सौंदर्यप्रसाधने, पॅकिंग मटेरियल आदींचा समावेश आहे. त्यापैकी काही सौंदर्यप्रसाधनांचे नमुने पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

ही कारवाई डॉ. अस्वार यांच्यासह अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील श्रीमती क. र. पाटील (वरिष्ठ लिपिक) आणि त्यांच्या पथकाने नाशिक विभागाचे सह-आयुक्त (औषधे) अशोक बरडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. नागरिकांनी सौंदर्यप्रसाधने खरेदी करताना त्यांच्या लेबलवर उत्पादन परवाना क्रमांक, उत्पादकाचे नाव व पत्ता, समूह क्रमांक, उत्पादनाची तारीख, मुदत बाह्यता तारीख आदी माहिती नमूद असल्याची खात्री व पडताळणी करूनच सौंदर्यप्रसाधने खरेदी करण्याचे आवाहन डॉ. अस्वार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# तालुका काँग्रेस कार्यकारिणीच्या सभेत विविध विषयांवर चर्चा

## राष्ट्रीय अध्यक्ष खरगेंच्या उत्तराखंडमधील भाषणानंतर केलेल्या जागा शुद्धीकरण कृतीचा निषेध

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर तालुका काँग्रेस कार्यकारिणीची सभा आज बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता येथील साने गुरुजी विद्यालयात झाली. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली. त्यात उत्तराखंडमधील हलदानी येथील रामलीला मैदानावर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या भाषणानंतर उजव्या विचारसरणीच्या तसेच भाजपच्या कार्यकर्त्यांनी त्या जागेचे शुद्धीकरण केले. त्यामुळे श्री. खरगे यांचा अपमान झाला. या कृतीचा जाहीर निषेधाचा ठराव तालुकाध्यक्ष बी. के. सूर्यवंशी यांनी मांडला. तो एकमताने मंजूर करण्यात आला.



*अमळनेर : तालुका काँग्रेस कार्यकारिणीच्या बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी येथील साने गुरुजी विद्यालयात झालेल्या सभेत बोलताना गजेंद्र साळुंखे.*

संदीप घोरपडे यांनी संघटना बांधणीबाबत विचार मांडले. त्यात बी.एल.ए. (ब्लॉक लेव्हल एजंट)चे स्थान व संघटनेत तरुणांचा सहभाग वाढविण्यासाठी काय करावे? याविषयी मार्गदर्शन केले. प्रा. श्याम पवार यांनी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसंदर्भात तालुक्यातील काँग्रेसची परिस्थिती चांगली आहे. फक्त मतदारांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. जर पक्षसंघटन वाढविले, तर पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत आपले उमेदवार निवडून येऊ शकतात, असे सांगितले.

गजेंद्र साळुंखे यांनी अमळनेरमधील काँग्रेस भवनाच्या जागेसंदर्भात बोलताना तेथील उगवलेली झाडे व बांधकामाचा मलबा साफसफाईचे काम पूर्ण झाले असून, जागा मोजणीसंबंधी भूमी अधीक्षक अभिलेख अर्ज कार्यालयात दिला असल्याचे सांगितले. ॲड. रज्जाक शेख यांनी वॉर्डा-वॉर्डात, खेड्या-खेड्यांत जाऊन संघटना बांधणीचे व नवयुकांना, तरुणांना संघटनेत सहभागी करून घेण्याचे आवाहन केले. यावेळी झालेल्या चर्चेत बन्सीलाल भागवत, पी. वाय. पाटील, राजेंद्र पाटील, रोहिदास कापडे, कन्हैयालाल कापडे, रामकृष्ण पाटील, दिलीप पाटील यांनी सहभाग नोंदविला. त्यानंतर ईद-ए-मिलाद'च्या शुभेच्छांचा कार्यक्रम झाला. तसेच निम व करणखेडे या गावांच्या जिल्हा बँकेच्या मतदानासाठीचा विकास सोसायटीचा ठराव अनुक्रमे अमळनेर तालुका काँग्रेस कमिटी चिटणीस राजेंद्र पाटील व ताराचंद सूर्यवंशी यांच्या नावाचा झाल्याने त्यांचे अभिनंदन व सत्कार गुणवंत पाटील, डॉ. प्रकाश सोनवणे, पीतांबर पाटील, भगवान संदानशीव यांनी केला. सभेत राजू भाट, सईद तेली, शालिग्राम पाटील, अशोक पाटील, लोटन पाटील, तौसीब तेली आदी उपस्थित होते. सुधाकर भैसे यांनी आभार मानले.

# सारबेटेजवळ छोटा हत्तीचा टायर फुटल्याने अपघात

### २२ वर्षीय जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील सारबेटे गावाजवळ छोटा हत्ती हे वाहन टायर फुटून उलटल्याने झालेल्या अपघातात २२ वर्षीय तरुण जखमी झाला. उपचारादरम्यान मृत्यू झाला. गोलू पठाण असे मृताचे नाव आहे. या घटनेमुळे सारबेटेसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सोमवारी सायंकाळी सातच्या सुमारास गोलू पठाण हा छोटा हत्ती वाहनातून प्रवास करीत होता.

सारबेटे गावाजवळ त्याचा टायर फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ते उलटले. या अपघातात पठाण गंभीर जखमी झाला. अपघातानंतर त्याला तातडीने अमळनेर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, त्याची प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी धुळे येथे हलविण्याचा सल्ला दिला. त्यानंतर त्याला धुळे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु उपचार सुरू असतानाच मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी सकाळी त्याचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने सारबेटे गावात शोककळा पसरली असून, पठाण कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.






*अमळनेर : येथील जय योगेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयात उपक्रमशील शिक्षिका सौ. स्मिताताई वानखडे यांच्या पुढाकाराने मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सीडबॉल निर्मिती उपक्रम राबविण्यात आला.*

# जय योगेश्वर विद्यालयात सीडबॉल निर्मिती उपक्रम

## विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत केला जागर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील जय योगेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयात उपक्रमशील शिक्षिका सौ. स्मिताताई सुखदेवराव वानखडे यांच्या पुढाकाराने मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी सीडबॉल निर्मिती उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत जागर करण्यात आला. मुख्याध्यापक के. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी वेळोवेळी विविध उपक्रम राबविले जातात. संशोधक मार्गदर्शिका प्रा. डॉ. नयना वाणी यांच्या मार्गदर्शनाखाली वानखडे या विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण साक्षरता रुजविण्यासाठी विविध उपक्रम घेत असतात.

या उपक्रमात वानखडे यांनी विद्यार्थ्यांना सीडबॉल म्हणजे काय? त्याची निर्मिती कशी केली जाते? पर्यावरण संवर्धनात त्याचे महत्त्व काय? याबाबत माहिती

पान २ वर


गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!
स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## संपादकीय

# सरकारी रुग्णालयेच मृत्युशय्येवर

भर पावसाळा सुरू असताना आगीच्या घटना घडाव्यात हे अधिकच धक्कादायक ठरते. अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातल्या नवजात शिशू अतिदक्षता विभागाला पहाटे आग लागली. आणि त्यात तीन नवजात शिशुंचा होरपळून मृत्यू झाला. एकूण नऊ बालके तिथे होती. अन्य बालकांना जरी सुरक्षित बाहेर काढले गेले असले, तरी त्यातल्या काही बालकांनाही आगीची झळ पोहोचलेली आहे. तीन वर्षांपूर्वी अशाच प्रकारची आग लागली होती. तेव्हा हे रुग्णालय जुन्या इमारतीतून नव्या इमारतीत हलवले गेले होते आणि आता पुन्हा तशाच प्रकारची आग लागावी. याचा अर्थ तो केवळ अपघात ठरत नाही. त्यात घातपाताचाही संशय येतो आहे. उन्हाळ्यामध्ये आगीच्या सर्वाधिक घटना घडत असतात. आणि अशा आगींची कारणेही ठरलेली असतात. आग म्हटल्यानंतर ती शॉर्टसर्किटमुळे लागली हे गृहित धरले जाते. परंतु शॉर्टसर्किट होण्याची कारणे शोधली जात नाहीत. किंवा शॉर्टसर्किटसारखे प्रकार घडू नयेत म्हणून नियमित फायर ऑडिट होण्याची आवश्यकता असते. दुर्दैवाने इमारती असो किंवा रुग्णालये असो. फायर ऑडिट हा प्रकार केला जात नाही. विशेषतः ज्या ठिकाणी रोज हजारो लोक येतात किंवा जेथे दिवसभरात सर्वाधिक विजेचा वापर होतो, अशा सर्व ठिकाणी वीजयंत्रणा सक्षम असणे गरजेचे ठरते. आज मोठमोठ्या इमारतींमध्ये किंवा पंचतारांकित हॉटेल्स अथवा बहुमजली इमारतींमध्ये वीज व्यवस्था अधिकाधिक आधुनिक पद्धतीने बसवली जात असते. त्यातही कन्सील स्वरूपाचीच म्हणजेच भिंतीच्या आतून विजेच्या वायरी टाकल्या जातात किंवा तशा पद्धतीचे विजेचे फिटींग केले जाते. अशा परिस्थितीत या कन्सील वायरिंगमध्ये कुठेही थोडेफार शॉर्टसर्किट झाले तर ते ताबडतोब लक्षात येऊ शकत नाही. आणि विशेष म्हणजे अशा शॉर्टसर्किटमधून इतर वायरिंगही वेगाने जळू शकते. म्हणजेच काही तासांतच आगीचे स्वरूप ऊग्र होते. म्हणूनच फायर ऑडीट करण्यासाठी आता तितक्याच नव्या तंत्रज्ञानाची आवश्यकता भासू लागली आहे.

गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्रात रुग्णालयांना आगी लागण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहेत. साधारणपणे २०२१ ते २०२६ या कालावधीत रुग्णालयांना आगी लागण्याच्या जवळपास सात घटना घडल्या. त्यातही २०२१ ला एकाच वर्षात पाच रुग्णालयांना आगी लागण्याचे प्रकार घडले होते. आणि या घटनांमध्ये तब्बल ३६ जणांचा मृत्यू झाला. तीन वर्षांपूर्वी अमरावतीच्याच रुग्णालयात आगीची घटना घडूनही तेथे योग्य ती उपाययोजना केली गेली नाही. अशाच प्रकारच्या नवजात शिशुंच्या काळजी केंद्रामध्ये आग लागण्याची घटना २०२१ च्या जानेवारी महिन्यात भंडारा जिल्हा रुग्णालयात घडली. त्यात दहा नवजात शिशुंचा मृत्यू झाला होता. २०२१ च्याच मार्च महिन्यात भांडुपला सनराईज रुग्णालय जे कोविड रुग्णालय म्हणून तयार केले गेले होते. तेथील आगीत दहा 'कोरोना'बाधित रुग्णांचा जीव गेला होता. अहिल्यानगर येथील सामान्य रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात लागलेल्या आगीतसुद्धा अकरा 'कोरोना'बाधित रुग्णांचा बळी गेला होता. नागपूरच्या वेल ट्रिट रुग्णालयात चार कोरोनाग्रस्त रुग्णांना जीव गमवावा लागला. आणि त्याच महिन्यात २०२१ ला मुंब्रा येथील रुग्णालयात लागलेल्या आगीत चार जणांचा जीव गेला होता. एकापाठोपाठ लागलेल्या या आगीच्या घटना यामागे जरी शॉर्टसर्किटची कारणे सांगितली तरी प्रत्यक्षात हलगर्जीपणा, बेजबाबदारपणा, म्हणजे रुग्णालयातल्या व्यवस्थापनातला गलथानपणा त्याला कारणीभूत ठरतो. आपला आजार बरा व्हावा किंबहुना आपल्या जीवावर आजारातून आलेले संकट दूर व्हावे म्हणूनच उपचार घेण्याकरीता लोक रुग्णालयात येतात. पण रुग्णालयांनाच आगी लागण्याचे प्रकार व्हावेत आणि त्यात रुग्णांना जीव गमावण्याची अत्यंत दुर्दैवी वेळ यावी हे अधिकच हृदयद्रावक ठरते. विशेषतः त्याच त्या पद्धतीच्या आगीच्या घटना घडतात. परंतु त्याविरोधात कोणतीही ठोस कारवाई होत नाही. स्वाभाविकपणे कारवाई होत नसल्यानेच या रुग्णालयांमधल्या गलथानपणाला संरक्षण मिळत राहते. अमरावतीचा हा प्रकार दुसऱ्यांदा घडत असल्याने तिथे केवळ चौकशी करून भागणार नाही. तर पुढच्या चार-आठ दिवसांत तिथे मोठ्या प्रमाणावर निलंबनाची आणि तिथे ठाण मांडून असलेल्या डॉक्टर कर्मचाऱ्यांची तडकाफडकी बदली करण्याची आवश्यकता आहे.

सातत्याने शासकीय रुग्णालयानाच आगी लागण्याचे प्रकार होत आहेत. याचा अर्थ तेथील व्यवस्थापन अत्यंत बेभरवशाचे किंबहुना मनमानी पद्धतीचे झालेले आहे. एकीकडे मुख्यमंत्र्यांनी महा ईएचआरम या कार्यपद्धतीचे उद्घाटन केले. म्हणजे सरकारी कार्यालयांच्या व्यवस्थापनात काटेकोरपणा आणण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यासाठी डिजिटल आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही त्यांनी जोर दिला. याच कार्यक्रमात त्यांनी राज्यातल्या शालार्थ घोटाळ्यामध्ये तंत्रज्ञान वापरूनही कशा प्रकारच्या बोगस नियुक्त्या केल्या गेल्या याचेही उदाहरण दिले. 'आंधळे दळते, कुत्र पीठ खाते', हेही त्यांनी आवर्जून सांगितले. म्हणजेच शासकीय कारभारामध्ये कशा प्रकारचा गलथानपणा सुरू आहे याची ती एकाअर्थी कबुलीच होती. आणि याच परिस्थितीचा सरकारी कार्यालयांमध्ये गैरफायदा घेतला जातो. सरकारी कारभार म्हटल्यानंतर तेथे कोणत्याही प्रकारची सुधारणा होऊ शकत नाही. आणि तेथील कारभार हा असाच बेभरवशाचाच असतो याची वारंवार प्रचिती लोकांना येत राहते. म्हणूनच सरकारी रुग्णालयांमध्ये जायला अनेक लोक घाबरतात. तेथे जाणारा वर्ग प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेला आणि जवळपास कुठेच काही सोय होत नसल्याने तो सरकारी रुग्णालयांचा आधार घेतो. परंतु तेथे केव्हा कोणत्या प्रकारची घटना घडेल हे सांगता येत नाही. गैरकारभार हा तर तेथे पाचवीलाच पूजलेला असतो.

## जय योगेश्वर विद्यालयात सीडबॉल निर्मिती उपक्रम

पान १ वरून

दिली. तसेच सीडबॉल तयार करण्याची शास्त्रीय पद्धत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून समजावून सांगितली. सीडबॉल तयार करण्यासाठी काळी सुपीक माती, चिकन माती, सेंद्रिय खत, कंपोस्ट खत व गांडूळ खत यांचे योग्य मिश्रण करून त्यामध्ये विविध देशी वृक्षांच्या बियांचा समावेश करण्यात येतो. या मिश्रणाचे छोटे गोळे तयार करून ते पावसाळ्यात डोंगर-दऱ्या, मोकळ्या अथवा पडीत जमिनीवर टाकता येतात. पावसाचे पाणी मिळाल्यानंतर सीडबॉल मऊ होऊन त्यातील बिया रुजतात आणि त्यापासून रोपे तयार होतात, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतः सीडबॉल तयार करून या उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. बारावीचे विद्यार्थी, विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

# सासूबाईंच्या किडनी दानाने जावयाला नवजीवन प्राप्त!

## मुलीची संसारवेल अबाधित राहण्याच्या भावनेतून घेतलेल्या निर्णयाचे सर्वत्र कौतुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : दोन्ही किडन्या निकामी झाल्याने गेल्या दोन वर्षांपासून डायलिसिसवर असलेल्या जावयाचे प्राण वाचविण्यासाठी सासूबाईंनी स्वतःची एक किडनी दान केल्याची हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. अमळनेर येथील रहिवासी व सेवानिवृत्त न्यायाधीश गुलाबराव पाटील यांच्या पत्नी सौ. सुशीलाबाई यांनी धाडसी निर्णय घेत जावई ॲड. अतुल रमेश चव्हाण यांना किडनी दान केली. किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने सौ. सुशीलाबाई यांनी जावयाला नवजीवन दिले असून, त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अमळनेर येथील रहिवासी व सेवानिवृत्त न्यायाधीश पाटील आणि त्यांच्या पत्नी सौ. सुशीलाबाई यांच्या कन्या कविता यांचा विवाह म्हसावद येथील ॲड. अतुल चव्हाण यांच्याशी झालेला आहे. सौ. कविता या नाशिक ग्राहक न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत आहेत, तर ॲड. अतुल चव्हाण हे नामांकित कंपनीत कायदेशीर सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. सुमारे दोन वर्षांपूर्वी ॲड. अतुल चव्हाण यांना आजाराने ग्रासले. तपासणीनंतर त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांच्यावर टप्प्या-टप्प्याने डायलिसिस सुरू करण्यात आले. मात्र, दीर्घकाळ डायलिसिसवर राहण्यापेक्षा किडनी प्रत्यारोपण हाच पर्याय असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे दोन्ही




*सौ. सुशीला पाटील ॲड. अतुल चव्हाण*

कुटुंबीयांसमोर मोठे संकट उभे राहिले. किडनी दाता मिळणे ही मोठी अडचण होती. दाता मिळाल्यानंतरही त्याची किडनी रुग्णाशी जुळणे आवश्यक असल्याने कुटुंबीय चिंतेत होते. अशा परिस्थितीत सौ. सुशीलाबाई यांनी पुढाकार घेतला. 'एक किडनी असतानाही माणूस निरोगी आयुष्य जगू शकतो. आपली एक किडनी जावयाला दिल्याने त्यांचे प्राण वाचतील आणि आपल्या मुलीचे वैवाहिक जीवनही सुरक्षित राहील,' हा सकारात्मक विचार करून त्यांनी स्वतःची किडनी दान करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नाशिक येथील नाईन पर्स हॉस्पिटलमधील डॉक्टरांकडे सौ. सुशीलाबाईंनी आपली इच्छा व्यक्त केली. त्यानंतर सौ. सुशीलाबाई आणि ॲड. अतुल चव्हाण यांच्या विविध वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. तपासण्यांमध्ये सौ. सुशीलाबाईंची किडनी जावयाशी जुळत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांनी आपली एक किडनी जावई ॲड. अतुल चव्हाण यांना दान केली.

मुंबई येथील तज्ज्ञ डॉ. अमोलकुमार पाटील, डॉ. नागेश आघोर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या वैद्यकीय पथकाने किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर ॲड. अतुल चव्हाण यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. जावयाचे प्राण वाचविण्यासाठी स्वतःची किडनी देण्याचा सौ. सुशीलाबाईंचा निर्णय केवळ वैद्यकीयदृष्ट्या महत्त्वाचा नसून सासू-जावयाच्या नात्यातील माणुसकी आणि जिव्हाळ्याचेही उदाहरण ठरला आहे. मुलीचे संसारजीवन अबाधित राहावे आणि जावयाला जीवनदान मिळावे, या भावनेतून त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे नातेवाईक आणि समाजातून सौ. सुशीलाबाई यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# प्रताप हायस्कूलच्या विद्यार्थ्यांकडून भारतीय जवानांसाठी राखी निर्मिती

## करुणा क्लबच्या माध्यमातून रक्षाबंधनाचा अनोखा उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



*अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या प्रताप हायस्कूलमध्ये 'आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत करुणा क्लबच्या माध्यमातून भारतीय जवानांसाठी घेण्यात आलेल्या राखी निर्मिती कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थी.*

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळाच्या प्रताप हायस्कूलमध्ये 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत करुणा क्लबच्या माध्यमातून भारतीय जवानांसाठी राखी निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने राख्या तयार करून त्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय जवानांना पाठविण्यात आल्या.

भारतीय सैनिक देशाच्या सीमांचे अहोरात्र रक्षण करीत असल्यामुळे आपण सुरक्षित जीवन जगत आहोत. देशरक्षक जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच त्यांच्याशी आपुलकीचा बंध निर्माण व्हावा, या उद्देशाने करुणा क्लबच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. यासाठी मागील आठवड्यात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना, "आपण रक्षाबंधन साजरे करतो; मात्र देशाच्या सीमेवर तैनात असलेले भारतीय जवान हा सण आपल्या कुटुंबीयांसोबत साजरा करू शकतात का?" असा प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आला. त्यातून जवानांना राखी पाठविण्याची संकल्पना विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली. राखी तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य व निर्मितीची पद्धत याबाबत कला विभाग प्रमुख डी. एन. पालवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले.

शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी घरून विविध साहित्य आणून शाळेत स्वतःच्या हाताने आकर्षक राख्या तयार केल्या. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत देशभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेचा संदेश दिला. राख्या तयार झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी एनसीसी कार्यालयाला भेट देऊन भारतीय जवानांना राख्या पाठविण्यासाठी आवश्यक पत्ते मिळविले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या सीमेवर तैनात भारतीय जवानांना पाठविण्यात आल्या. रक्षाबंधनाच्या निमित्ताने देशरक्षक जवानांपर्यंत आपुलकीचा धागा पोहोचविणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

या उपक्रमास खानदेश शिक्षण मंडळाचे चेअरमन नीरज अग्रवाल यांचे प्रोत्साहन लाभले. मुख्याध्यापक ए. डी. भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. करुणा क्लबच्या या उपक्रमाचे संचालन व राखी निर्मितीचे प्रशिक्षण कला विभाग प्रमुख डी. एन. पालवे यांनी केले. उपक्रमासाठी शिक्षक सचिन अहिरे, कृष्णा कोळी, निखिल पाटील, जयश्री पाटील, सुहास खांजोडकर, नम्रता दोरकर, प्रसाद बुवा व सागर पवार यांनी सहकार्य केले.

# 'ईद-ए-मिलाद'च्या पार्श्वभूमीवर अमळनेरमध्ये विशेष स्वच्छता मोहीम

## प्रभाग क्र. १ ते १८ मध्ये स्वच्छता; जंतुनाशक पावडरची फवारणी




*अमळनेर : 'ईद-ए-मिलाद' या सणाच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी येथील पालिकेच्या स्वच्छता विभागाकडून शहरातील प्रभाग क्रमांक १ ते १८ मध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.*


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : 'ईद-ए-मिलाद' या सणाच्या पार्श्वभूमीवर येथील पालिकेच्या स्वच्छता विभागाकडून शहरातील प्रभाग क्रमांक १ ते १८ मध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

सणाच्या पार्श्वभूमीवर मुस्लीमबहुल भागांसह शहरातील विविध ठिकाणी मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी विशेष स्वच्छता करण्यात आली. नागरिकांना स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण मिळावे, यासाठी पालिकेच्या स्वच्छता विभागाकडून विशेष नियोजन करण्यात आले. मोहिमेदरम्यान प्रभाग क्रमांक १ ते १८ मधील विविध ठिकाणी झाडू मारणे, कचरा संकलन तसेच परिसराची स्वच्छता करण्यात आली. यासोबतच सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यांच्या कडेला तसेच आवश्यक ठिकाणी जंतुनाशक पावडरची फवारणी करण्यात आली. ही मोहीम स्वच्छता निरीक्षक संतोष जाधव, किरण कंडारे व संतोष माणिक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता कर्मचारी, मुकादम व संबंधित पथकाच्या माध्यमातून राबविण्यात आली. सणासुदीच्या काळात शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत राहावी आणि नागरिकांना स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी वातावरण मिळावे, यासाठी पालिकेकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. नागरिकांनीही आपल्या परिसरात स्वच्छता राखून पालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन स्वच्छता विभागातर्फे करण्यात आले आहे.

# 'हम तो तेरे आशिक है!'

मनाच्या एखाद्या चिंतनमय क्षणी काही गाणी आठवतात. या गीतांची आठवण येते आणि मन आश्वस्त नव्हे, तर अस्वस्थ होते. हवे असतात फुरसतीचे चार-दोन लम्हे, पण मनात दाटून येतात न सुटलेले काही प्रश्न. मनाच्या सतारीवर गहिरी सुरावट उमटते. आधीच घायाळ झालेल्या या मनातून आठवणी भळभळा वाहू लागतात. याच आठवणींतून मग पाझरू लागतात या जीवाला शांत करणारी व मनाला दिलासा देणारी काही गाणी. ती गाणी व तो आवाज आपले जगणे सहज-सुलभ करतात. त्यांचा आवाज साधा, भावपूर्ण, हृदयस्पर्शी व थोडा अनुनासिक असल्याने संगीतप्रेमींना भावला. आवाजाच्या वेगळेपणामुळे त्यांची गाणी आजही रसिकांमध्ये लोकप्रिय आहेत. म्हणून सर्वाधिक लोकप्रिय पार्श्वगायकांपैकी ते एक होते, 'मुकेशचंद माथुर ऊर्फ मुकेश'! त्यांचा आज दि. २७ ऑगस्ट रोजी ५० वा सुवर्णमहोत्सवी स्मृतिदिन यानिमित्त...



त्यावेळचे सुप्रसिद्ध अभिनेते स्व. मोतीलाल हे मुकेशच्या बहिणीच्या लग्नात त्यांचे गाणे ऐकून प्रभावित झाले होते. मुकेशला त्यांनी मुंबईला बोलावून घेतले. संगीततज्ज्ञ पं. जगन्नाथ प्रसाद यांच्याकडे संगीत शिकण्यासाठी मोतीलाल यांनी मुकेशला सुपूर्द केले. गायक, अभिनेता म्हणून मुकेशला हिंदी सिनेमा 'निर्दोष' (१९४१) मध्ये पहिल्यांदा अभिनयाची संधी मिळाली. त्यातील 'दिल ही बुझा हुआ' हे गीत गाण्याचा योग आला. पण पार्श्वगायक म्हणून त्यांचे प्रथम हिट Song, 'दिल जलता है तो जलने दे' (पहली नजर - १९४५) हे होते. संगीतकार अनिल विश्वास यांचं संगीत लाभलेलं हे गाणं, खूप लोकप्रिय ठरलं. मुकेशच्या गायकीवर सुरूवातीचे काही वर्षे कुंदनलाल सैगलचा प्रभाव होता. हे गाणं ज्यावेळी सैगलनी ऐकले त्यावेळी त्यांनी म्हटले, की "कमाल आहे, मला आठवत नाही, हे गाणे मी कधी म्हटले!" त्यानंतर मात्र संगीतकार नौशादने त्यांना सैगल शैलीतून बाहेर पडायला व स्वतःची गायन शैली विकसित करण्यासाठी मदत केली. नौशादजींकडे मुकेशनी अनेक चित्रपटांत अनेक मधुर चालीची गाणी म्हटली. उदा.- अनोखी अदा (१९४८), मेला (१९४८), अंदाज (१९४९) वगैरे.

भारतीय क्रिकेट संघातील प्रसिद्ध फिरकी गोलंदाज 'भागवत चंद्रशेखर' मुकेशचे प्रचंड फॅन होते. मैदानावर गोलंदाजी करताना प्रोत्साहन देण्यासाठी सुनील गावस्कर मुकेशचे गीत त्यांच्यासमोर गुणगुणत असे. त्यांच्या आवाजाची (मुकेशच्या) किमया, चंद्रशेखरला विकेट मिळवून देण्यात मोलाचं सहकार्य करीत असे. कारण मुकेशजींच्या आवाजात नैसर्गिक कारुण्य व उदासी होती, जी इतर कोणाकडे नव्हती. त्यांची गायकी शास्त्रीय संगीताच्या गुंतागुंतीच्या हरकती किंवा तानांवर आधारित नव्हती. आवाजाला मर्यादा असूनही प्रत्येक गीताला त्यांनी न्याय दिला. मनाच्या गाभाऱ्याला स्पर्श करणारा भावनिक व प्रामाणीक स्वर होता, मुकेशजींचा. रफीचं अष्टपैलूत्व व किशोरदांची ऊर्जा, या गुणवैशिष्ट्यांनी अवघे हिंदी चित्रपट संगीत व्यापले असताना मुकेशने आपले स्थान निर्माण करून ते अढळ ठेवले होते. 'ग्रेट शो मॅन स्व. राज कपूरचा' आवाज व वेदनेला वाट करून देणारा स्वर, अशी मुकेशजींची ख्याती झाली होती. राज कपूरच्या अभिनय व त्यातल्या प्रांजळपणाला लाभलेल्या मुकेशजींच्या आवाजाने, भूमिका (रोल) अधिक परिणामकारक होत असे, इतकी दोघांची केमिस्ट्री जमली होती. नंतरच्या काळात राज कपूर व्यतिरिक्त इतर सर्व प्रथितयश हिरोंसाठी मुकेश गायले.

संगीतकार शंकर-जयकिशनकडे मुकेशजींनी १३३, संगीतकार कल्याणजी-आनंदजीकडे ९९ व इतर संगीतकारांकडे (एकूण १३०० पैकी) विविध भाषांतील सुद्धा गाणी म्हटली. ३५ वर्षांच्या कारकिर्दीत, मुकेश-राजकपूर व शंकर-जयकिशनच्या (त्रिकूट) गीतांनी हिंदी सिनेसंगीत तर समृद्ध केलेच, पण परदेशात देखील अफाट लोकप्रियता मिळविली आहे.

अभिनंत्यांपैकी एकट्या राज कपूरसाठी ११० गाणी, मनोज कुमारसाठी ४७ गाणी व दिलीपकुमारकरिता २० गाणी मुकेशजींनी म्हटली. 'कई बार देखा है (रजनीगंधा-१९७४)' या गीतासाठी त्यांना सर्वश्रेष्ठ पार्श्वगायकाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच ४ वेळा फिल्मफेअर पुरस्काराने मुकेश सन्मानित करण्यात आले आहेत. ती गाणी म्हणजे - १) सब कुछ सीखा हमने (अनाडी-१९५९) २) सबसे बडा नादान (पहचान-१९७०) ३) जय बोलो बेईमान की (बेईमान-१९७२) ४) कभी कभी मेरे दिल में (कभी कभी-१९७६). या चार पैकी तीन गीतांचे संगीतकार आहेत, शंकर-जयकिशन. शिवाय 'गुगल'ने २०१६ मध्ये त्यांच्या ९३ व्या जयंतीला त्यांना श्रद्धांजली अर्पण केली होती. याशिवाय देश-विदेशात अनेकदा त्यांच्या संगीत कारकिर्दीचा गौरव करण्यात आला आहे.

मुकेशजींनी त्यांच्या संगीत प्रवासात, संगीतकार अनिल विश्वासपासून तर आर. डी. बर्मन व इतर त्या काळातील सर्व यशस्वी संगीतकारांकडे मनापासून व भरभरून गायन केले आणि सगळ्यांच्या Music Room सुरांनी सुगंधित केल्या. इतर पुरुष गायकांबरोबर गायलेल्या युगल गीतात लता दीदी बाजी मारून जाताना दिसतात, पण लता-मुकेश यांच्या गाण्यात मुकेशसुद्धा तितकाच लक्षात राहतो. हे त्यांचं वैशिष्ट्य आहे. स्व. लता दीदींच्या प्रगतीला ज्या-ज्या लोकांनी सहकार्य केलं त्यात मुकेशजीही होते. दीदीसाठी ते 'मुकेश भैया' होते. त्या 'स्वरयोगिनी' या पुस्तकात म्हणतात, की 'मुकेश भैयानेच मला सर्वप्रथम नौशादजी कडे नेलं होतं.'

अशा या अत्यंत सरळमार्गी, सज्जन, शांत व लाखात एक माणूस असलेल्या मुकेशजींनी दि. २२ जुलै १९७६ रोजी म्हणजे अमेरिका दौऱ्यावर जाण्याच्या चार दिवस आधी लग्नाचा ३० वा वाढदिवस साजरा केला होता. परंतु दि. २७ ऑगस्टला डेट्रॉईट येथे दौऱ्यादरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. अवघ्या वयाच्या फक्त ५३ व्या वर्षी त्यांनी रसिकांचा व संगीतजगताचा निरोप घेतला. पण मृत्यूनंतर देखील त्यांचे काही चित्रपट प्रदर्शित झाले होते. उदा.- 'सत्यम, शिवम, सुंदरम (शेवटचे गीत- चंचल शीतल-१९७८).' आज त्यांना शब्दांची नव्हे; तर त्यांच्याच गीताची आदरांजली अर्पण करूया- "हम तो जाते अपने गाम, अपनी राम राम राम सबको राम राम राम!"

**- शरद आ. सोनवणे, अमळनेर**
मो. : ९४२०१ ०८३०५

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ३ बार यूपीएससी में असफल, चौथे प्रयास में बने 'आयपीएस'

सक्सेस स्टोरी

## एलबीएसएनएए की प्रोफेसर की बेटी संग बनी खूबसूरत लव स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) की परीक्षा पास कर भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) में पहुंचने वाले अधिकारियों की कहानियां अक्सर प्रेरणा देती हैं। लेकिन छत्तीसगढ़ के बस्तर के पुलिस अधीक्षक (एसपी) शलभ कुमार सिन्हा की कहानी सिर्फ संघर्ष और सफलता तक सीमित नहीं है, बल्कि इसमें प्यार, भरोसा और किस्मत का भी दिलचस्प मेल देखने को मिलता है। तीन बार यूपीएससी में असफल होने के बाद चौथे प्रयास में आयपीएस बनने वाले शलभ कुमार सिन्हा की प्रेम कहानी फेसबुक से शुरू हुई और बाद में शादी तक पहुंची। खास बात यह है कि उनकी पत्नी जान्हवी पांडेय, लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी (एलबीएसएनएए) की पूर्व हिंदी प्रोफेसर ज्योति पांडेय की बेटी हैं। अखबार

छत्तीसगढ़ के जशपुर जिले के रायकेरा गांव में १२ मई १९८४ को जन्मे शलभ कुमार सिन्हा ने अपनी स्कूली पढ़ाई कोरबा से पूरी की। इंजीनियरिंग करने के बाद उन्होंने बीएएलसीओ (भारत एल्युमिनियम कंपनी) में नौकरी शुरू की, लेकिन उनका सपना सिविल सेवा में जाने का था। इसलिए उन्होंने नौकरी छोड़ दी और दिल्ली जाकर यूपीएससी की तैयारी शुरू कर दी।

हालांकि सफलता उन्हें आसानी से नहीं मिली। पहले प्रयास में वह प्रीलिम्स भी पास नहीं कर सके। दूसरे प्रयास में इंटरव्यू तक पहुंचे लेकिन अंतिम चयन नहीं हुआ। तीसरे प्रयास में फिर प्रीलिम्स में असफल रहे। लगातार तीन असफलताओं के बावजूद उन्होंने हिम्मत नहीं हारी और चौथे प्रयास में ऑल इंडिया २४४ वीं रैंक हासिल कर २०१४ बैच के आयपीएस अधिकारी बने।

### एलबीएसएनएए में ट्रेनिंग के दौरान शुरू हुई प्रेम कहानी

आयपीएस बनने के बाद शलभ कुमार सिन्हा मसूरी स्थित लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी (एलबीएसएनएए) में ट्रेनिंग के लिए पहुंचे। इसी दौरान एक दिन फेसबुक पर उन्होंने एक कॉमन फ्रेंड की पोस्ट में जान्हवी पांडेय को देखा। उन्हें याद आया कि दिल्ली में यूपीएससी की तैयारी के दौरान उन्होंने इस लड़की को कई बार देखा था। दोनों छत्तीसगढ़ से थे, लेकिन कभी बातचीत नहीं हुई थी।

शलभ ने बिना किसी झिझक के जान्हवी को फेसबुक पर फ्रेंड रिक्वेस्ट भेज दी। कुछ दिनों बाद जान्हवी ने रिक्वेस्ट स्वीकार कर ली। इसके बाद दोनों के बीच बातचीत शुरू हुई। धीरे-धीरे



दोस्ती गहरी होती गई और यही दोस्ती प्यार में बदल गई।

### २०१६ में परिवार की सहमति से की शादी

करीब दो साल तक एक-दूसरे को समझने के बाद दोनों ने अपने रिश्ते के बारे में परिवारों को बताया। दोनों परिवार इस रिश्ते के लिए राजी हो गए और साल २०१६ में शलभ कुमार सिन्हा और जान्हवी पांडेय विवाह बंधन में बंध गए। आज दोनों की जोड़ी प्रशासनिक जगत की चर्चित जोड़ियों में गिनी जाती है।

### जान्हवी का बचपन एलबीएसएनएए में बीता

जान्हवी पांडेय की मां ज्योति पांडेय लंबे समय तक एलबीएसएनएए में हिंदी की प्रोफेसर रहीं। इसी वजह से जान्हवी का बचपन मसूरी स्थित अकादमी परिसर में बीता। उन्होंने बचपन से हर साल आयएएस और आयपीएस अधिकारियों को ट्रेनिंग लेते देखा। यहीं से उनके मन में भी खाकी वर्दी पहनने का सपना जन्मा। उन्होंने भी यूपीएससी की तैयारी की और प्रीलिम्स परीक्षा पास की, लेकिन मेन्स परीक्षा में सफलता नहीं मिली। हालांकि बाद में उनकी शादी एक आयपीएस अधिकारी से हुई और उनका सपना एक अलग रूप में साकार हो गया।

### नक्सल क्षेत्र में पोस्टिंग के दौरान निभाया हर मुश्किल में साथ

शादी के कुछ समय बाद ही शलभ कुमार सिन्हा की पोस्टिंग छत्तीसगढ़ के सबसे संवेदनशील नक्सल प्रभावित जिले सुकमा में हो गई। यहां उन्हें कई-कई दिनों तक जंगलों में सुरक्षा बलों के साथ अभियान चलाना पड़ता था।जान्हवी बताती हैं कि सुकमा जाने से पहले ही उन्हें विश्वास था कि उनके पति एक दिन वहां महत्वपूर्ण जिम्मेदारी संभालेंगे। एक बार पालोडी इलाके में नक्सली हमले के बाद कई दिनों तक दोनों का संपर्क नहीं हो पाया था। उस समय परिवार बेहद चिंतित था, लेकिन सुरक्षित लौटने के बाद उनका विश्वास और मजबूत हो गया।

### कई जिलों में निभा चुके हैं अहम जिम्मेदारी

२०१४ बैच के आयपीएस अधिकारी शलभ कुमार सिन्हा छत्तीसगढ़ के कई महत्वपूर्ण जिलों में पुलिस अधीक्षक रह चुके हैं। उन्होंने सुकमा, कवर्धा, दुर्ग, कांकेर जैसे जिलों में अपनी सेवाएं दी हैं। वर्तमान में वह बस्तर (जगदलपुर) के पुलिस अधीक्षक के रूप में कार्यरत हैं और नक्सल प्रभावित क्षेत्र में कानून-व्यवस्था बनाए रखने की जिम्मेदारी संभाल रहे हैं।

### संघर्ष, सफलता और प्यार की मिसाल

आयपीएस शलभ कुमार सिन्हा की कहानी यह साबित करती है कि लगातार असफलताओं के बाद भी अगर लक्ष्य के प्रति समर्पण बना रहे तो सफलता जरूर मिलती है। वहीं, उनकी फेसबुक से शुरू हुई प्रेम कहानी यह भी दिखाती है कि कभी-कभी जिंदगी के सबसे खूबसूरत रिश्ते बिल्कुल अप्रत्याशित तरीके से शुरू होते हैं। संघर्ष, मेहनत और भरोसे के दम पर उन्होंने न सिर्फ यूपीएससी का सपना पूरा किया, बल्कि अपने जीवनसाथी का भी साथ पाया।

# हार्ट अटॅकचा धोका वाढविणारे 'हे' ५ पदार्थ

## हेल्दी समजून खाण्याची चूक करू नका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



फ्लेवर्ड योगर्टमध्ये अनेकदा मोठ्या प्रमाणात अतिरिक्त प्रक्रिया केलेली साखर असते. अतिरिक्त साखरेचे यकृतातील चरबीमध्ये रूपांतर होते. ज्यामुळे तुमचे वाईट कोलेस्ट्रॉल वाढते आणि हृदय, रक्तवाहिन्यांसंबंधीचा धोका वाढतो.

**प्रोटीन बार :** फिटनेससाठी उपयुक्त असलेले प्रोटीन बार हाई-फ्रुक्टोज कॉर्न सिरपने भरलेले असते. हे घटक शरीरातील दाह वाढवितात आणि धमन्यांमध्ये अडथळा निर्माण होण्याची प्रक्रिया वेगवान करतात.

**फळांचा रस :** फळांचा रसामध्ये, ताज्या फळांमध्ये आढळणारे आवश्यक फायबर नसते. तो प्यायल्याने रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढते आणि यकृताला धोकादायक चरबी साठवण्यास भाग पाडते.

**पॅकेट फूड :** पॅकेट फूड बनवायला सोपे जरी असले तर यामध्ये सोडियमचे प्रमाण प्रचंड असते. सोडियमच्या उच्च पातळीमुळे शरीरात पाणी साठते, ज्यामुळे हृदयाला अधिक जोर लावावा लागतो आणि रक्तदाब वाढतो.

**तूप :** तुपामध्ये संतृप्त चरबी असते. जर एखाद्या व्यक्तीला हृदयाची समस्या असेल तर त्याने तुपाचे सेवन मर्यादित प्रमाणात करावे. संतुलित आहार आणि कमी चरबीयुक्त पर्यायांचा अवलंब करून हृदयाचे आरोग्य राखता येते.

**मासे-चिकन :** जास्त तेल आणि मसाल्यांनी बनवलेले प्रक्रिया केलेले किंवा मांसाहारी पदार्थ हृदयाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम करतात.

**बदाम :** बदाम हे प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा चांगला स्रोत आहे, परंतु त्यामध्ये चरबी आणि कॅलरीज देखील असतात, त्यामुळे हृदयाच्या रुग्णांनी बदाम जास्त प्रमाणात सेवन करू नये.



## श्रावणी सोमवारच्या उपवासासाठी झटपट फलाहार रेसिपी केळी-खजूर शेक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**साहित्य :** २ पिकलेली केळी, ४-५ बिया काढलेले मऊ खजूर, १ ग्लास दूध, ४-५ बदाम/काजूचे तुकडे, १/४ चमचा वेलची पूड.

**कृती :** मिक्सरच्या भांड्यात चिरलेली केळी, खजूर, थोडे दूध घालून बारीक वाटून घ्या. त्यात उर्वरित दूध आणि वेलची पूड घालून पुन्हा एकदा ब्लेंड करा.
वरून बदाम-काजूच्या कापांनी सजवून सर्व्ह करा.
खजूरमध्ये ग्लुकोज, फ्रक्टोज, सुक्रोजचे प्रमाण जास्त असते. ज्यामुळे त्वरित ऊर्जा मिळते. खजूरमध्ये आयर्न भरपूर असते. त्यामुळे हिमोग्लोबिन वाढण्यास मदत होते.
केळीमधील 'पेक्टिन' हे फायबर पचन संस्था सुधारते.
पोटॅशियम आणि व्हिटॅमिन B६ मुळे हृदयाचे ठोके नियमित राहतात.

## उंटीणीचे दूध : वाळवंटातील 'पांढर सोने'!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वाळवंट म्हटले, की आपल्या डोळ्यासमोर येते ते म्हणजे उंट हा प्राणी. वाळंवटात राहणाऱ्या लोकांसाठी हा प्राणी म्हणजे सर्वस्व. प्रवासापासून खाण्यापिण्यापर्यंत याच प्राण्यावर त्यांचे जीवन अवलबून असते. पण तुम्हाला आर्चय वाटेल, की उंटीणीचे दूध आता एवढे महत्त्वाचे ठरत आहे की अनेकांना यातून मोठे आर्थिक उत्पन मिळत आहे. आरोग्यासाठी उपयुक्त असलेल्या पोषणमूल्यांमुळे या दुधाला वाळवंटाचे पांढरे सोने म्हटले जात आहे.



एक उंटीण एका दिवसात साधारणपणे ४ ते १० लिटर दूध देते. चांगल्या जातीच्या आणि अनुकूल वातावरणातील उंटीणी दिवसाला १५ ते २० लिटरपर्यंतही दूध देऊ शकतात? या दुधाचे एक वैशिष्ट्य म्हणजे याचे दही बनविणे कठीण असते. यातील फॅट स्ट्रक्चर वेगळे असल्यामुळे उंटीणीच्या दुधाचे पारंपरिक पद्धतीने सहज दही बनत नाही. तसेच यात फॅटचे प्रमाण कमी असते. गाई-म्हशीच्या तुलनेत यात फॅट (चरबी) खूप कमी असते. त्यामुळे अनेक देशांमध्ये या दुधाची मागणी वाढत आहे

**दीर्घकाळ टिकणारे :** यातील ॲंटीमायक्रोबियल घटकांमुळे हे दूध सामान्य तापमानावरही इतर दुधापेक्षा जास्त वेळ टिकते. याचाही फायदा साठवणुकीसाठी होतो.

**ऑटिझमसाठी उपयुक्त :** संशोधनानुसार यातील ॲंटिऑक्सिडंट्स ऑटिझमची लक्षणे कमी करण्यास सहाय्यक ठरतात. लॅक्टोज इंटॉलरन्स असलेले लोक : ज्यांना गाई-म्हशीच्या दुधाची ॲलर्जी आहे किंवा दूध पचत नाही त्यांच्यासाठी हा सुरक्षित पर्याय ठरतो.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढविणे :** यात व्हिटॅमिन सी गाईच्या दुधापेक्षा सुमारे ३ पट अधिक असते, तसेच ॲंटीबॅक्टेरियल आणि ॲंटीव्हायरल घटक भरपूर असतात.

**मधुमेही रुग्ण :** रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी नैसर्गिक इन्सुलिनयुक्त पर्याय म्हणून अनेक रुग्ण हे दूध नियमित घेतात.
त्वचा उजळवणारे साबण, क्रीम्स तसेच आयुर्वेदिक/न्यूट्रॉस्यूटिकल सप्लिमेंट्स बनवण्यासाठी कंपन्या मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात.
राजस्थान आणि गुजरातच्या कच्छ भागातील स्थानिक उंटपालक (मालधारी/रबारी समुदाय) यांच्याकडून हे ताजे दूध मिळते. सुमारे १२५ ते १५० रुपये प्रतिलिटर इतकी याची किंमत जाते. ऑनलाइन किंवा विशेष पुरवठादारांकडून २५० ते ५०० रुपये प्रतिलिटर दर जाऊ शकतो.




## जाणून घ्या आरोग्याचे फायदे!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टोमॅटोचा वापर केवळ पदार्थांची चव वाढविण्यासाठी नाही तर आरोग्यासाठी देखील फायदेशीर मानला जातो.

**टोमॅटोचा रस प्या :** जर तुम्ही रोज टोमॅटोचा रस प्यायला तर शरीरावर काय परिणाम होतो ते या वेबस्टोरीतून जाणून घ्या.

**रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते :** टोमॅटोच्या रसामध्ये व्हिटॅमिन सी आणि ॲंटिऑक्सिडंट्स भरपूर असतात, जे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात.

**त्वचा चमकते :** टोमॅटोचा रस दररोज प्यायल्याने चेहऱ्यावरील डाग कमी होतात. मुरुम, पुरळ कमी होतात.

**डोळ्यांचे आरोग्य सुधारते :** टोमॅटोच्या रसमध्ये व्हिटॅमिन ए असते, जे डोळ्यांची दृष्टी सुधारण्यासाठी फायदा होतो.

**टोमॅटोचा रस कसा बनवावा? :** टोमॅटोचा रस बनविण्यासाठी लाल टोमॅटो घ्या, ते स्वच्छ धुवून त्याचे तुकडे करा. मिक्सरमध्ये बारीक रस करा.

**हे मसाले मिक्स करा :** चव वाढविण्यासाठी त्यात थोडेसे काळे मीठ, जिरे पावडर किंवा पुदिन्याची पाने घाला.

# या स्ट्रेटेजीमुळे पहिल्या प्रयत्नात पीएसआय, एसटीआय, एसआर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोणतेही ध्येय साध्य करण्यासाठी योग्य 'स्ट्रेटेजी' (व्यूहनीती) म्हणजे अचूक नियोजन आणि पावले उचलण्याचा मार्ग आहे. जर हा मार्ग योग्य पद्धतीने अवलंबिला तर यश मिळतेच.

### १) योग्य नियोजन आणि ५० टक्के पाठांतर

एमपीएससी कम्बाईंड (ग्रुप बी) सारख्या एमसीक्यू आधारित परीक्षांमध्ये संकल्पना समजण्यासोबतच ५० टक्के पाठांतर खूप महत्त्वाचे असते. महत्त्वाच्या व्याख्या, कलमे, तारखा आणि डेटा लक्षात ठेवण्यासाठी पाठांतर आणि वारंवार सराव गरजेचा आहे.

### २) टेस्ट सिरीज आणि टाईम मॅनेजमेंट

परीक्षा पद्धतीमध्ये यशाचा मुख्य मार्ग म्हणजे टेस्ट सिरीज. १ तासात १०० प्रश्न सोडविण्याचा सराव नियमित टेस्ट सिरीज देऊन वेळेचे अचूक व्यवस्थापन केल्यानेच शक्य होतो. मॉक टेस्ट दिल्यानंतर



चुकांचे विश्लेषण करणे आणि उणिवांवर काम करणे आवश्यक आहे.

### ३) जुन्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण

मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिकांमधील पॅटर्न समजून घेणे आणि एमपीएससीचे लॉजिक ओळखणे ही यशाची गुरुकिल्ली आहे. प्रत्येक विषयाचे प्रश्न कसे फिरवून विचारले जातात हे समजल्यास अचूक उत्तरे निवडणे सोपे जाते.

### ४) मर्यादित पुस्तके आणि वारंवार उजळणी

अभ्यासक्रमासाठी बाजारात उपलब्ध असणारी भरमसाठ पुस्तके वापरण्याऐवजी मर्यादित व प्रमाण पुस्तके निवडणे. एकाच पुस्तकाची अनेक वेळा रिव्हिजन केल्यामुळे गोंधळ टळतो आणि परीक्षा खंडात आत्मविश्वास टिकून राहतो.


### ५) सातत्य आणि मानसिक खंबीरपणा

घरची किंवा वैयक्तिक परिस्थिती कशीही असली तरी अभ्यासातील सातत्य आणि सकारात्मकता कधीही कमी होऊ न देणे. एकाच प्रयत्नात किंवा पुढील प्रयत्नांत पद मिळविण्यासाठी स्वतःच्या चुकांमधून शिकत राहणे.




# रक्षाबंधनाच्या दिवशी चंद्रग्रहण, भद्रा पाहा

## यंदा राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त व नियम काय आहेत?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यावर्षी रक्षाबंधनाचा सण शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणार आहे. दरवर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी राखी बांधण्यासाठी भद्राचा काळ निषिद्ध मानला जातो. त्यामुळे शुभ मुहूर्तावरच बहिणी त्यांच्या भावाच्या मनगटावर राखी बांधतात. परंतु तुम्हाला माहिती आहे का की यावर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी पंचकाची छाया आहे. अशा परिस्थितीत रक्षाबंधनाच्या दिवशी पंचकामुळे राखी कधी बांधावी याबाबत गोंधळ निर्माण झाला आहे. तसेच चंद्रग्रहण देखील या दिवशी असल्याने राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त व सर्व नियम जाणून घेऊया.

रक्षाबंधनाच्या दिवशी पंचक आणि भद्राचे सावट गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी दुपारी १.३६ वाजता होईल. दि. २८ ऑगस्टला रक्षाबंधन आहे आणि पंचक संपूर्ण पाच दिवस चालतो. त्यामुळे दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे ३.२४ वाजता पंचक संपेल.

पौर्णिमेची तिथी दि. २७ ऑगस्ट रोजी सुरू होईल. भद्रा रात्री ९.२९ वाजेपर्यंत राहील. त्यामुळे रक्षाबंधन दि. २७ ऑगस्टऐवजी दि. २८ ऑगस्ट रोजी साजरे केले जाईल. दि. २८ ऑगस्टला सूर्योदयासह पौर्णिमेची तिथी ९ वाजून ४९ मिनिटांपर्यंत असेल.

### पंचकमध्ये राखी बांधणे शुभ की अशुभ?

कोणतेही शुभ कार्य पंचकामध्ये केले जात नाही. परंतु पूजा आणि धार्मिक कार्ये इत्यादींवर बंदी नाही. पंचकामध्ये पूजा, जप, तप इत्यादी सर्व कामे केली जातात. यावेळी पंचक गुरुवारपासून (दि. २७ ऑगस्ट) सुरू होत आहे. गुरुवारपासून (दि. २७ ऑगस्ट) सुरू होणारा पंचक सामान्य मानला जातो. तुम्ही त्यात चांगले काम करू शकता, त्याचा कोणताही प्रतिकूल परिणाम तुमच्यावर होणार नाही. रक्षाबंधनाच्या दिवशी शताब्दी नक्षत्र राहील. त्यामुळे या दिवशी उपवास करण्याची गरज नाही. रक्षाबंधन हे शताब्दी नक्षत्रात असेल. त्यामुळे तुम्ही कोणतीही काळजी न करता मुहूर्तावर राखी बांधू शकता.

### रक्षाबंधनाच्या दिवशी ग्रहण

यावर्षीचे शेवटचे चंद्रग्रहण शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी होणार आहे. हे या वर्षातील शेवटचे चंद्रग्रहण असेल. तर अशा परिस्थितीत प्रश्न असा आहे की तुम्ही चंद्रग्रहणाच्या दिवशी राखी का बांधू शकता. कारण चंद्रग्रहणाच्या सुतक कालावधीला ग्रहण सुरू होण्यापूर्वी ९ तास लागतात. मात्र, हे चंद्रग्रहण भारतात दिसणार नाही. त्यामुळे तुम्ही कोणतीही काळजी न करता रक्षाबंधनाचा सण साजरा करू शकता.

# राशीनुसार भावाला राखी बांधा; मिळेल शुभ फळ

## भावाची होईल भरभराट, तुमचे नाते होईल घट्ट!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणी आपल्या भावांना राखी बांधतात. ती राखी केवळ रेशमी धागा नसून प्रेमाचे बंधन असते. भाऊ आणि बहिणीमधील पवित्र नाते आहे. ज्योतिषशास्त्रानुसार जर बहिणीने आपल्या भावांना त्यांच्या राशीनुसार राखी बांधली तर त्यांचे नाते आणखी मजबूत होते आणि भावाचे आयुष्य देखील वाढते तसेच त्याला सुख समृद्धी लाभते. चला तर मग पाहूया राशीनुसार भावाला कशी राखी बांधावी.

### मेष आणि वृश्चिक

जर तुमच्या भावाची राशी मेष आणि वृश्चिक असेल तर तुम्ही तुमच्या भावाला लाल किंवा केशरी रंगाची राखी बांधू शकता. यामुळे तुमचे प्रेम वाढेल आणि तुमचे नाते पूर्वीपेक्षाही अधिक चांगले होईल. तसेच या दिवशी भावाला केशरचा तिलक लावणे शुभ ठरेल.

### वृषभ आणि तूळ

रक्षाबंधनाच्या दिवशी वृषभ आणि तूळ या राशींच्या भावांना त्यांच्या बहिणींनी गुलाबी व पांढरा रंग असलेली राखी बांधावी. या राशीच्या भावांसाठी हा रंग सर्वांत शुभ मानला जातो. गुलाबी रंग हा प्रेम आणि नात्याचा रंग मानला जातो. याशिवाय पांढरे मोती नातेसंबंधांमधील तणाव दूर करून प्रेम वाढवतात.

### मिथुन आणि कन्या

मिथुन आणि कन्या या राशींच्या भावांसाठी राखीचा हिरवा रंग सर्वांत शुभ मानला जातो. या राशीचा स्वामी बुध आहे आणि बुध ग्रहाचा आवडता रंग हिरवा आहे. या रंगाची राखी बांधल्याने जन्मकुंडलीत बुध ग्रहाचे स्थान सुधारते आणि तुमच्या भावाला कारकिर्दीत यश मिळते. मिथुन आणि कन्या राशीच्या लोकांनी रक्षाबंधनाच्या दिवशी गाईला कोणताही हिरवा चारा दिला पाहिजे.

### कर्क

या राशीच्या भावाला त्यांच्या बहिणींनी पांढऱ्या किंवा चांदीच्या रंगाची राखी बांधावी. यामुळे भाऊ-बहिणीच्या नात्यात चार चांद लागतील, असे मानले जाते. या राशीचा स्वामी चंद्र असल्याने आणि चंद्र शुभ करण्यासाठी सर्वात भाग्यवान रंग पांढरा आणि चंदेरी आहेत. या राशीच्या लोकांना मोत्यांसह राखी बांधणे देखील खूप शुभ ठरेल.

### सिंह

या राशीच्या भावांना त्यांच्या बहिणींनी पिवळ्या आणि नारंगी रंगाच्या राखी बांधाव्यात. या राशीचा स्वामी सूर्य आहे आणि पिवळे आणि नारंगी रंग सूर्याचे प्रतिनिधित्व करतात. या राशीच्या भावांना पिवळी आणि नारंगी राखी बांधल्याने त्यांच्या जीवनात आनंद आणि समृद्धी वाढते.

### धनू आणि मीन

या राशींचे भाऊ असतील तर त्यांना बहिणींनी पिवळ्या, भगव्या रंगाची राखी बांधावी. यामुळे त्यांच्या नात्यातील बंध आणखी दृढ होईल. या राशींचा स्वामी गुरू आहे आणि गुरू देखील भगवान विष्णूंशी संबंधित असल्याचे मानले जाते. त्यामुळे या राशींच्या भावांना मोरपंखी रंगाची राखी बांधावी.


### मकर आणि कुंभ

या राशींच्या लोकांना त्यांच्या बहिणींनी निळी आणि हिरवी राखी बांधली पाहिजे. अशी राखी ज्यावर स्वस्तिकचे चिन्ह असेल ती राखी त्यांच्यासाठी शुभ ठरेल.

# देवाला राखी का बांधतात?

## भगवंताला रक्षासूत्र बांधण्याचे महत्त्व, मुहूर्त आणि पूजाविधी जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



रक्षाबंधन म्हणजे भावा-बहिणीच्या अतूट नात्याचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. मात्र, भारतातील अनेक भागांमध्ये या दिवशी देवाला राखी किंवा रक्षासूत्र बांधण्याची परंपरा आहे. भक्त आपल्या आराध्य देवतेच्या प्रतिमेला किंवा मूर्तीला राखी अर्पण करतात आणि मनोभावे प्रार्थना करतात. रक्षाबंधनाला देवाला राखी का बांधली जाते त्याचे धार्मिक काही महत्त्व आहे का तसेच देवाला राखी बांधण्याची योग्य पद्धत कोणती चला तर जाणून घेऊया.

**रक्षाबंधनाला देवाला राखी बांधण्याची परंपरा का आहे?**

रक्षाबंधनाचा सण रक्षासूत्र बांधणे आणि रक्षण करण्याच्या भावनेशी जोडलेला आहे. भावाच्या मनगटावर बांधले जाणारी राखी अथवा रक्षासूत्र म्हणजे नकारात्मक शक्ती, वाईट ऊर्जा आणि संकटांपासून रक्षण करणारा पवित्र धागा मानला जातो. हा संकल्प भावा-बहिणीमध्ये घेतला जात असला तरी आपल्या सर्वांचे खरे रक्षण भगवंत, ईश्वर करतात अशी श्रद्धा आहे. त्यामुळेच अनेक ठिकाणी रक्षाबंधनाला देवालाही राखी बांधण्याची परंपरा आहे.

**भक्त-भगवंताच्या भावनिक नात्याचे प्रतीक**

रक्षाबंधनात बहीण भावाच्या मनगटावर राखी बांधते, त्याच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करते. या बदल्यात भाऊ बहिणीला कायम रक्षण करण्याचे वचन देतो आणि भेटवस्तू देतो. त्याचप्रमाणे भक्त देवाला राखी बांधून स्वतःच्या जीवनाच्या रक्षणाची कामना करतात. याकडे भक्त आणि भगवंत यांच्यातील भावनिक नात्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. रक्षाबंधनाला भगवंताला राखी बांधण्याची परंपरा भक्ती, समर्पण आणि सुरक्षेच्या भावनेशी जोडली जाते. यासंदर्भात श्रीकृष्ण आणि द्रौपदीची कथाही सांगितली जाते. कथेनुसार श्रीकृष्णांच्या बोटाला दुखापत झाल्यावर द्रौपदीने आपल्या वस्त्राचा तुकडा फाडून त्यांच्या बोटाला बांधला होता. त्यानंतर श्रीकृष्णांनी द्रौपदीच्या रक्षणाचे वचन निभावले. देवाला राखी बांधण्याचे महत्त्व स्पष्ट करणाऱ्या अनेक लोककथा आणि पौराणिक कथाही आहेत. रक्षाबंधनाला शिवशंकर, भगान विष्णु, गणपती आणि बजरंगबली हनुमान यांना राखी बांधणे शुभ मानले जाते. अशी मान्यता आहे की, असे केल्यामुळे कुटुंबावर काहीही संकट येत नाही. भगवंताची सदैव कृपादृष्टी राहते. आपल्याकडे काही ठिकाणी भगवंतासह शेत, पशू आणि घराच्या दरवाजांनाही राखी बांधली जाते, जेणेकरून वाईट नजर आणि संकट दूर राहावे.

**देवाला राखी बांधण्यासाठी शुभ मुहूर्त**

पंचांगानुसार देवाला राखी बांधण्यासाठी सर्वांत उत्तम वेळ खालीलप्रमाणे आहे.

**शुभ मुहूर्त (२८ ऑगस्ट २०२६)** – सकाळी ५.५७ वाजल्यापासून सकाळी ९.४८ वाजेपर्यंत.

**अभिजित मुहूर्त** – दुपारी ११.४४ वाजल्यापासून दुपारी १२.३५ वाजेपर्यंत.

**देवाला राखी बांधण्याची योग्य पद्धत**

जर एखाद्या भक्ताला आपल्या आराध्य देवाला राखी बांधायची असेल किंवा त्यांच्या चरणी अर्पण करायची असेल, तर..

स्नान करून सर्वप्रथम पूजास्थान स्वच्छ करावे. त्यानंतर भगवानांच्या मूर्ती किंवा प्रतिमेसमोर दिवा लावावा देवाला टीळा लावून फुले आणि नैवेद्य अर्पण करावा. त्यानंतर भगवंताला राखी किंवा रक्षासूत्र अर्पण करावे राखी बांधल्यानंतर कुटुंबीयांच्या आणि प्रियजनांच्या सुख-शांतीसाठी प्रार्थना करावी. त्यानंतर आरती म्हणावी आणि सर्वांना प्रसाद द्यावा.

# वर्षातील शेवटचे चंद्रग्रहण कुंभ राशीत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**राहू वाढविणार ५ राशींच्या अडचणी!**

या वर्षातील शेवटचे चंद्रग्रहण शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी होणार आहे. हे वर्षातील शेवटचे चंद्रग्रहण असेल. हे चंद्रग्रहण कुंभ राशीमध्ये असेल. या काळात केतूची नजर कुंभावरही असेल. यावेळी सूर्यालाही केतूंचा त्रास होईल. कारण सूर्य आणि चंद्र हे सिंह नक्षत्रात आहेत. चंद्रग्रहण आणि राहु केतूच्या प्रभावाखाली, कर्क, सिंह यासह ५ राशींना खूप संघर्ष करावा लागू शकतो. या राशींना काही ना काही कारणास्तव अनावश्यक खर्च आणि आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागू शकते. कौटुंबिक जीवनातही अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

**कर्क :** या चंद्रग्रहणादरम्यान, राशीचा स्वामी चंद्र कुंभाद्वारे राहु केतूपासून ग्रस्त असेल कारण ग्रहणादरम्यान राहु चंद्राबरोबर असेल आणि तो चंद्राला गिळेल तर सातव्या घराद्वारे केतूवर चंद्राचा विपरित परिणाम होईल. अशा परिस्थितीत कर्क राशीच्या प्रभावामुळे या आणि पुढील महिन्यात तुम्हाला आर्थिक बाबींमध्ये अनावश्यक खर्चाला सामोरे जावे लागेल. एखादा चुकीचा निर्णय तुम्हाला संकटात टाकू शकतो. आरोग्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. काही अनपेक्षित परिस्थितीमुळे तुमचे मन गोंधळून जाईल.

**सिंह :** या राशीच्या लोकांसाठी हे चंद्रग्रहण तुमच्या राशीच्या सातव्या घरात असेल. या ग्रहणादरम्यान, राहुची दृष्टी तुमच्या राशीवर देखील असेल आणि केतू तुमच्या राशीत असेल. या वेळी कायदेशीर बाबींमध्ये जोखीम घेणे आणि निष्काळजीपणा टाळणे आपल्यासाठी चांगले असेल. मालमत्तेच्या प्रकरणांमध्ये अडकणे टाळावे. वाहन चालवताना सावधगिरी बाळगा कारण अपघाताची शक्यता आहे. जर तुम्हाला आरोग्याशी संबंधित काही समस्या असतील तर तुम्हाला त्यातून आराम मिळू शकतो. वैवाहिक जीवनात, तुमच्या जोडीदाराच्या आरोग्यामुळे किंवा कोणत्याही मतभेदांमुळे तुम्हाला तणावाचा सामना करावा लागू शकतो.

**मकर :** या राशीसाठी, चंद्रग्रहण त्यांच्या राशीच्या दुसऱ्या घरात असेल. अशा परिस्थितीत तुम्हाला नातेसंबंधांच्या बाबतीत संयम आणि गांभीर्याची काळजी घ्यावी लागेल. जवळच्या नातलगामुळे तुम्हाला मानसिक ताण आणि आर्थिक अडचणींना देखील सामोरे जावे लागू शकते. यावेळी तुम्हाला भावनिक होण्याऐवजी व्यावहारिकदृष्ट्या विचार करावा लागेल, अन्यथा तुमची समस्या कायम राहू शकते. खर्चात वाढ होईल परंतु उत्पन्नासह तुम्ही परिस्थिती संतुलित ठेवू शकाल.

**कुंभ :** हे चंद्रग्रहण तुमच्याच कुंभ राशीमध्ये लागणार असल्याने तुमच्या राशीवर देखील याचा जास्तीत जास्त परिणाम दिसून येईल. अशा परिस्थितीत सप्टेंबर महिन्यात तुम्हाला खूप संयमाने आणि गंभीरपणे चालावे लागेल. या काळात तुमचे आरोग्यही चांगले राहू शकते. कोणताही मोठा आर्थिक निर्णय घेण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे. तुम्हाला काही कारणास्तव पैसे खर्च करावे लागू शकतात. सासरच्या नातेवाईकांशी वादात अडकणे टाळावे लागेल, अन्यथा नात्यात समस्या उद्भवू शकतात. जोखमीची गुंतवणूक टाळा. कामाच्या ठिकाणी तुम्हाला थकवा जाणवू शकतो.

**मीन :** या राशीवर साडेसाती आधीच सुरू आहे आणि राशीच्या बाराव्या घरात आता चंद्र ग्रहण लागणार आहे. अशा परिस्थितीत तुम्ही आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्येपासून त्रस्त होऊ शकता. आर्थिक बाबींमध्ये तुम्हाला काळजीपूर्वक काम करावे लागेल, अन्यथा संधी हाताबाहेर जाऊ शकते. तुम्हाला तुमच्या विरोधकांशी आणि शत्रूंशी सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. काही लोकांच्या चेहऱ्यावरुन मुखवटा निघेल आणि त्यांचे सत्य देखील बाहेर येऊ शकते, ज्यामुळे तुम्हाला मानसिक त्रास होऊ शकतो. घर आणि मालमत्तेच्या बाबतीत तुम्हाला काही अनपेक्षित खर्च करावे लागू शकतात.

# रक्षाबंधनास बहिणीला कोणत्या ७ भेटवस्तू देणे टाळावे?

## त्या का अयोग्य आहेत आणि त्याऐवजी कोणते चांगले पर्याय आहेत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या नात्यातील सर्वांत पवित्र आणि भावनिक सण आहे. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्याच्या दीर्घायुष्यासाठी, सुखासाठी आणि समृद्धीसाठी शुभेच्छा देते, तर भाऊ आपल्या बहिणीला भेटवस्तू देऊन आपले प्रेम आणि वचन व्यक्त करतो. भेटवस्तू ही केवळ एक वस्तू नसते, तर त्यामागे दडलेला संदेश आणि भावना सर्वांत महत्त्वाची असते. म्हणूनच योग्य भेटवस्तू निवडणे खूप महत्त्वाचे ठरते. अनेकदा लोक भेटवस्तू निवडताना काहीतरी चांगले आणि महागडे देण्याचा विचार करतात. परंतु जर भेटवस्तू विचारपूर्वक निवडली नसेल, तर ती बहिणीच्या मनात नकारात्मक छाप सोडू शकते आणि नकळतपणे नात्यात दुरावा निर्माण करू शकते.

### १) जास्त रोख रक्कम देणे

बहिणीला रोख रक्कम देणे हा एक सोपा आणि सुरक्षित पर्याय वाटत असला तरी, रक्षाबंधनाला केवळ पैसे दिल्याने कधीकधी नाते औपचारिक वाटू शकते. यामुळे असा समज होऊ शकतो की, तुम्ही भेटवस्तूसाठी वेळ आणि विचार केला नाही आणि केवळ औपचारिकता पूर्ण करत आहात. त्याऐवजी, तिला वैयक्तिक भेटवस्तू, तिच्या गरजेची वस्तू किंवा तिच्या छंदाशी संबंधित भेटवस्तू द्या, जेणेकरून तिला वाटेल की तुम्ही विचारपूर्वक निवड केली आहे.

### २) काळे कपडे किंवा वस्तू

हिंदू पौराणिक कथांनुसार काळा रंग सामान्यतः अशुभ मानला जातो आणि नकारात्मक ऊर्जेशी संबंधित असतो. विशेषतः सण आणि शुभ प्रसंगी हा रंग टाळण्याची प्रथा आहे. त्यामुळे, रक्षाबंधनसारख्या शुभ प्रसंगी आपल्या बहिणीला काळ्या रंगाचे कपडे किंवा दागिने देणे टाळावे. त्याऐवजी, हलक्या, फिकट किंवा तेजस्वी रंगांच्या भेटवस्तू अधिक शुभ आणि फायदेशीर मानल्या जातात.

### ३) मोती देऊ नका

वास्तुशास्त्रानुसार मोती हे अनेकदा अश्रू आणि दुःखाचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे, रक्षाबंधनसारख्या आनंददायी आणि उत्साहपूर्ण सणाच्या



दिवशी बहिणीला मोती भेट देणे अशुभ मानले जाते. असे केल्याने जीवनातील अडचणी आणि मानसिक त्रास वाढतो, असे म्हटले जाते. या दिवशी आनंद आणि सुदैवाचे प्रतीक असलेल्या भेटवस्तू निवडणे उत्तम.

### ४) पुन्हा भेट दिलेल्या वस्तू

जुन्या भेटवस्तू पुन्हा पॅक करून बहिणीला देणे ही एक मोठी चूक आहे. यामुळे केवळ तुमच्या भावना दुखावल्या जात नाहीत, तर जर तुमच्या बहिणीला हे कळले, तर तुमच्या नात्यात विश्वासाला तडा जाऊ शकतो. भेटवस्तूंमध्ये नाविन्य आणि वैयक्तिक विचारांना नेहमीच प्राधान्य दिले पाहिजे, जेणेकरून तिला विशेष वाटेल.

### ५) खूप स्वस्त भेटवस्तू

भेटवस्तूचे मूल्य तिच्या किमतीत नसते, तर त्यात गुंतवलेल्या भावनांमध्ये असते. मात्र, जर भेटवस्तू निकृष्ट दर्जाची असेल किंवा घाईघाईने खरेदी केल्यासारखी वाटत असेल, तर ते तुमच्या बहिणीसाठी निराशाजनक ठरू शकते. यावरून असे दिसून येते की, तुम्ही त्यासाठी मेहनत घेतली नाही किंवा तपशिलांकडे लक्ष दिले नाही. म्हणून, कमी बजेटमध्येही, गुणवत्ता आणि साधेपणा यांचा समतोल साधणारी भेटवस्तू निवडा.

### ६) काचेची भांडी

वास्तुशास्त्रानुसार बहिणीला काचेच्या वस्तू भेट देणे टाळावे. असे मानले जाते की काच नाजूक असते आणि सहज फुटू शकते, जे नात्यातील दुरावा किंवा तणावाचे प्रतीक आहे. त्यामुळे, रक्षाबंधनसारख्या शुभ प्रसंगी काचेच्या वस्तूंऐवजी टिकाऊ आणि शुभ वस्तू निवडणे अधिक श्रेयस्कर मानले जाते.

### ७) अत्यंत वैयक्तिक किंवा अनुचित वस्तू

रक्षाबंधन हा एक कौटुंबिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील सण आहे. त्यामुळे, अतिशय वैयक्तिक कपडे किंवा कुटुंबात अस्वस्थ वातावरण निर्माण करू शकतील अशा वस्तूंसारख्या अत्यंत वैयक्तिक भेटवस्तू देणे टाळावे. भावंडांच्या नात्यात प्रतिष्ठा आणि आदर अत्यंत महत्त्वाचे असतात. त्याऐवजी, तुम्ही पारंपरिक पोशाख, स्कार्फ किंवा पारंपरिक दागिने यांसारख्या वस्तू देऊ शकता.

### भेटवस्तू देऊन नात्यातील जवळीक वाढवा

भेटवस्तू देण्याचा खरा उद्देश केवळ काहीतरी देणे हा नसून, नात्यातील जिव्हाळा व्यक्त करणे हा आहे. जेव्हा तुम्ही भेटवस्तू निवडताना तुमच्या बहिणीच्या आवडीनिवडी, गरजा आणि भावनांचा विचार करता, तेव्हा ती भेट नेहमीच खास बनते. रक्षाबंधनाला तुमच्या बहिणीला अशी भेटवस्तू द्या, ज्यामुळे तिला आनंद होईल, तिचा अभिमान वाटेल आणि ती तुमची आठवण काढेल.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)